INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 3.452

ISSN - 2348-7143

Vol.- 4 Issue - 1

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March
2017



## SIGNIFICANCE OF THE THOUGHTS OF MAHATMA PHULE AND DR. B. R. AMBEDKAR



Chief Editor -
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof. (Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Vol. 4, Issue-1
ISSN : 2348-7143
Jan-Feb-March 2017

# INDEX


| No. | Title of the Paper | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Editorial | Prof. Dhanraj T. Dhangar | 04 |
| 2 | Mahatma Jotiba Phule and a Social Revolutionary | Dr. D. G. Ushir | 05 |
| 3 | Mahatma Phule and Social Justice | Prof. A. B. Raut | 09 |
| 4 | वर्तमानकाळात महात्मा फुले यांच्या विचारांची सापेक्षता | डॉ. पंकजकुमार नन्नवरे | 12 |
| 5 | महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज | डॉ. रामदास रसाळ | 15 |
| 6 | शेतकऱ्यांचा असूड : शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे दर्शन | डॉ. भाऊसाहेब गमे | 18 |
| 7 | महात्मा फुले यांचे कृषिविषयक विचार | डॉ. सुरेश बन्सपाल | 22 |
| 8 | महात्मा फुलेंच्या अपेक्षित 'सरकारचे शेतीविषयक धोरण' | प्रा. बंडू चौधरी | 25 |
| 9 | शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे जनक : महात्मा जोतिबा फुले | डॉ. वैशाली कोटंबे | 28 |
| 10 | महात्मा जोतिबा फुले आणि स्त्री शिक्षण | डॉ. डी. जी. उशीर | 32 |
| 11 | महात्मा फुले यांचे मराठी साहित्याला योगदान | डॉ. मंदा नांदुरकर | 35 |
| 12 | महात्मा फुले यांचे वाङ्मयीन कार्य | डॉ. संजय शिंदे | 38 |
| 13 | विचारवंत साहित्यिक : महात्मा ज्योतीराव फुले | डॉ. प्रमोद अंबेकर | 42 |
| 14 | 'तृतीय रत्न'-मराठीतील पहिले सामाजिक नाटक | डॉ. भाऊसाहेब गमे | 48 |
| 15 | महात्मा फुले यांचे 'तृतीय रत्न' : एक मूल्यमापन | श्री आस्तिक गोवारकर | 51 |
| 16 | फुले- आंबेडकरी विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. रामदास रसाळ | 54 |
| 17 | डॉ. आंबेडकर : दलित चळवळीचे प्रणेते | डॉ. भूषण बंड | 57 |
| 18 | आंबेडकरी विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | प्रा. हेमंतकुमार बागडे | 60 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांसंबंधी विचार | डॉ. लता वाकचौरे | 65 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित सामाजिक न्याय | प्रा. माधव चोले | 69 |
| 21 | डॉ. आंबेडकरांचे परराष्ट्र धोरण विषयक विचार | डॉ. पंकजकुमार नन्नवरे | 74 |
| 22 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारविषयक धोरण | डॉ. डी. जी. उशीर | 77 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित सामाजिक न्याय

**प्रा. माधव चोले**
**राज्यशास्त्र विभाग**
**देगलूर महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड**
**मो.क्रं. ९९७०५६३३८५**
cholemadhav@gmail.com

भारताच्या संविधानाविषयी गेल्या सहा दशकामध्ये समाजाच्या सर्वच स्तरामध्ये आदराची भावना निर्माण झालेली आहे. पण भारताच्या शेजारील देशांमध्ये श्रीलंकेने सत्तरीच्या दशकात आपल्या संविधानात फेरबदल केले. बांग्लादेशाचेही केवळ पाच वर्षात संविधान मोडकळीस आलेले होते. तर चीनमध्ये संविधान चार वेळा बदलले आहे. या पार्श्वभुमीवर भारतीय संविधानाचे यश पाहता येईल.[१] एका अर्थाने १९४८-१९४९ मध्ये भारतीय लोकशाहीसाठी राज्यघटना लिहीणे सोपे होते. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे जगभरात लोकशाही शासन निर्मितीचे प्रयोग यशस्वी होत होते. पण भारतासारख्या विषमता मुलक देशात राज्यघटना टिकवणे अवघड होते. पण तरीही मात्र सहा दशके झाली तरी भारतीय संविधानाची संरचना टिकून आहे. कारण भारतीय संविधान समाजहितासाठी बदलायला शक्य आहे. आणि तसे झालेले आहे. मुख्य मुद्दा संविधानात समाजहित सामावलेले आहे. म्हणून संविधानाने सर्वांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.[२]

भारतीय राज्यघटना ज्या काळात निर्माण होत होती. तिला दोन मुख्य संदर्भ होते. एक राष्ट्रीय घडामोडीचा आणि दूसरा आंतरराष्ट्रीय घडामोडीचा. पहिले म्हणजे देशांतर्गत धर्माच्या आधारावर देशांची फाळणी होत होती. तसेच फाळणीमूळे मानवी हत्याकांडाचे भीषण दृश्य, निर्वासितांचे प्रश्न, देशांतर्गत राज्यरचनेचा प्रश्न, राष्ट्रबांधणीचा प्रश्न या घटना संविधान निर्माण करणाऱ्यांच्या समोर घडत होत्या. त्यामूळे घटनाकार जागृत होवून दुरदृष्टीपणाने घटना निर्मिती प्रक्रिया करत होते. दुसरा जो संदर्भ आहे जागतिक घडामोडीचा यामध्ये हिंसापातातून दुसरे महायुध्द संपलेले होते. आणि लोकशाही शासन स्थापनेला अनुकूल वातावरण निर्माण झालेले होते. तसेच संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करुन जागतिक शांततेसाठी प्रयत्न करण्यात आलेला होता. UNO ने मानवी हक्कांची सनद जाहीर केलेली होती. त्याचप्रमाणे रशियन राज्यक्रांतीनंतर रशियाच्या पुढाकाराने चीनमध्ये साम्यवादी क्रांती होवून साम्यवादी शासन निर्माण झालेले होते. या सर्व घटनांमूळे घटना निर्माण करणाऱ्यांमध्ये लोकशाही मुद्यावरचा विश्वास वाढलेला होता. तसेच कल्याणकारी राज्य राबविण्याकडे कल वाढलेला होता. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील टोकाची सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करुन लोकशाही शासन कसे आणता येईल याचा पुरेपूर जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे.[३]

**घटनेचा सरनामा :-**

घटनेचा सरनामा हे तर घटनेचे ध्येय, धोरण, स्वरुप व गाथा यांचा आरसा असतो. संक्षिप्त भाषेत पण अर्थपूर्ण शब्दांत संकीर्णपणे केलेले ते घटनेवरील भाष्यच असते. उद्देशपत्रिका जरी पंडित जवाहरलाल नेहरुंनी निर्माण केली तरी ज्या आंबेडकरांनी लोकशाही मुल्यांची घटना साकार करण्यात प्रमुख योगदान दिले. त्यांच्याच लेखणीतून घटनेचा मतितार्थ सरनाम्याच्या स्वरुपात व्यक्त होणे हे स्वाभाविक, योग्य व औचित्यपूर्ण होते. त्यांनी ही जबाबदारी समर्थपणे व निर्णायकरित्या पार पाडली आहे. सरनाम्याच्या रुपात घटनेचा आशय आपल्याशी बोलत आहे. असा भास होतो. तो प्रत्येक नागरिकाने मुखद्गत करुन त्याचे नेहमी स्मरण करणे आवश्यक आहे. उद्देशपत्रिकेत नवसमाज उभारणीची ताकत आहे. असे त्यांचे म्हणणे होते. सरनाम्यात बदल करता येत नाही असा

ISSN : 2348-7143
Jan-Feb-March 2017

निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. मुळ उद्देशपत्रिकेत धर्मनिरपेक्षता समाजवाद हे शब्द नसले तरी संविधानातील इतर तरतुदीमधून त्याचा बोध होतो हे स्पष्ट होते. पण नंतरच्या काळात काही प्रतिगामी शक्ती जेव्हा घटनेला अभिप्रेत असलेल्या समाजपरिवंना विरुध्द हालचाली करु लागल्या तेंव्हा १९७६ ला घटनेत दुरुस्ती करुन जाणीवपूर्वक व घटनेच्या मुळ हेतुचा पुनरुच्चार करण्यासाठी हे शब्द समाविष्ट करण्यात आले. पण नरेंद्र मोदी सरकारने २०१५ मध्ये हे दोन शब्द वगळुन टि.व्ही. वर जाहिरात दिली होती. त्यावरच विरोधकांनी धारेवर धरल्यावर त्यांच्या सहकार्यांनी संबंधित मंत्र्यांनी उत्तर दिले की, संविधानाच्या मुळ उद्देशपत्रिकेत हे शब्द नव्हते आणि ते आंबेडकरांना पण अपेक्षित नव्हते. त्यांना अपेक्षित असते तर तेंव्हाच ते शब्द समाविष्ट केलेले असते पण मुद्दा असा आहे की ह्या शब्दांचा अर्थ, संविधानाच्या अनेक तरतुदीमधून अभिव्यक्त होत असतो. त्यामूळे केलेले नसावे. पण हे शब्द सरकारने टाळणे अयोग्यच आहे.'

**धम्म आणि संविधानात साधर्म्य :-**

डॉ.आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीय समाजात मुलगामी परिवर्तन घडवून आणावे, हा समाज विज्ञाननिष्ठ, इहवादी आणि करुणावादी व्हावा यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

बाबासाहेब आंबेडकर ज्या काळात भारतीय संविधानाला आकार देत होते. त्याच काळात आंबेडकरांचे भावविश्व आणि विचारविश्वात, बौध्द धम्म पक्के रुतलेले होते. त्यामुळे धम्मातील तत्वे, विचार यांचा प्रभाव संविधानावर झाल्याचे स्पष्ट जाणवते. अशोक चक्र भारताच्या राष्ट्रध्वजावर आहे. या चक्राला सत्यधर्मांचे आणि शांततापूर्ण परिवर्तनाचे प्रतीक मानले जाते. २६ जानेवारी १९५० रोजी सारनाथ मधील अशोक स्तंभाचे शीर्ष आपले राष्ट्रचिन्ह म्हणून स्वीकारले आहे. हा स्तंभ अशोकाने मृगदाय वन येथे उभारला होता. येथेच बुध्दाला मानव कल्याणाचे तत्वज्ञान प्राप्त झालेले होते. आणि येथेच त्यांचे धम्म-व्याख्यानही झालेले होते. यावरुन संविधानाच्या देहावरही धम्मप्रतीक आहे आणि संविधानाच्या अंतरंगातही धम्मच आहे. म्हणून धम्म हा भारतीय संविधानाचा प्राण म्हणायला हवे.

धम्मात, इहवादी, तत्वज्ञान, बुध्दीवाद, विज्ञानदृष्टी, प्रगतीवादी दृष्टीकोण, अंधश्रध्देला विरोध, मानवातील भेदला विरोध, स्त्री-पुरुष समानता, दयाबुध्दी यास महत्व होते आणि याचे प्रतिबिंब संविधानात आहे. एवढेच नव्हे तर संविधानाच्या उद्देशपत्रिकेत असलेले स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मुद्दे आपण फ्रेंच क्रांतीतून घेतलेली नसून आपण ती बुध्दाच्या धम्मातून घेतलेली आहे असे डॉ.आंबेडकर सांगतात. याचा अर्थ धम्माचे ध्येय आणि संविधानाचे ध्येय यात साधर्म्य दिसते. संविधानाला जो माणुस अभिप्रेत आहे तोच धम्माला अभिप्रेत आहे.

भारतीय संविधानाचे तत्वज्ञान उद्देशपत्रिका मुलभुत हक्क, मार्गदर्शन तत्वे आणि कर्तव्ये यामध्ये दडलेले आहे. आणि यातूनच आंबेडकरांनी भारतातील टोकाची सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट करुन नवभारताची उभारणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कलम १५ नुसार भेद मान्य नाही, १७ नुसार अस्पृश्यता समाप्त केली आहे. ४४ नुसार समान नागरी संहिता, ४७ नुसार मादक पेयावर बंदी, ४६ नुसार दुर्बल घटकांचे हित संविधानाला महत्वाचे वाटते, ५१ (ज्ञ) नुसार विज्ञानदृष्टी, मानवतावाद, शोधक बुध्दी, आणि सुधारणावादाचा पुरस्कार करते तसेच धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदाच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनांमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावण्याची आणि स्त्रीयांच्या प्रतिष्ठेचा उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करण्याची भूमिका संविधानात स्पष्टपणे मांडलेले आहे.'

**सामाजिक न्याय आणि आरक्षण :-**

जॉन रॉल्स ने आपल्या **"थेअरी ऑफ जस्टीस"** या ग्रंथात निसर्गाने ज्यांना क्षमता देतांना हात आखुडता घेतलेला आहे. अथवा समाजाने कृत्रिमरित्या काही मानवी समुहांना वंचित शोषित ठेवलेले आहे. अशांना

राज्यसंस्थेने झुकते माप देवून समाजव्यवहारात सहभागी करुन व्यस्त त्यांना सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा मिळवून द्यावी. असा सामाजिक न्यायाचा अर्थ सांगितला होता. भारतात पहिल्यांदा कोल्हापूर संस्थानचे शाहु महाराज यांनी अस्पृश्यांसाठी आणि इतर मागास जातीसाठी शिक्षणाची दारे उघडी करुन वसतीगृहे बांधली. ते एवढ्यावरच थांबले नाहीत. तर २६ जूलै १९०२ साली आपल्या संस्थानात ५० टक्के जागा अस्पृश्यांसाठी भरण्याचे शाही फर्मान काढले. त्यांना उच्चवर्गीय मंडळींनी विरोध केला पण ते जुमानले नाहीत.

शाहु महाराजांच्या नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना शिक्षण, नोकरी मिळावी आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी प्रयत्न केले. त्यांनी इंग्रज सरकारला अस्पृश्यांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमून शिफारशींची अंमलबजावणी करावी. असा आग्रह धरला. इंग्रज सरकारने इ.एम.एस.स्टार्ट च्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण केली. म्हणून या समितीला 'स्टार्ट समिती' असे नामकरण करण्यात आले. या समितीत डॉ.बी.आर.आंबेडकर, डॉ.व्ही.बी.सोलंकी, श्री ठक्कर बाप्पा, डॉ.देशपांडे या समितीने सखोल अभ्यास करुन १९३४ ला इंग्रज सरकारला आपला अहवाल सादर केला. त्यांच्या शिफारशी -

१) अस्पृश्यांना शाळेत प्रवेश देवून त्यांना शिष्यवृत्ती द्यावी.

२) यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्यात यावे.

३) त्यांना सरकारी नोकरीमध्ये आरक्षण देण्यात यावे.[६]

सामाजिक कृत्रिम अनिष्ठांचा नाश हीच सामाजिक न्यायाची मुळ संकल्पना आहे. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक न्याय शक्य नाही. डॉ.आंबेडकरांनी सामाजिक न्यायाचे ध्येय गाठण्यासाठी संविधानात विविध प्रावधाने केलेली आहेत. ज्यांना शैक्षणिक आणि आर्थिक अधिकारांपासून शतकानुशतके वंचित ठेवण्यात आले होते. त्यांना शासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपाद्वारे संरक्षक भेद करुन त्यांची उन्नती साधण्याचे उद्दिष्टच त्यातून अधोरेखित केलेले आहे. डॉ.आंबेडकरांनी म्हटले आहे, "आरक्षणामुळे वंचितांना शोषितांना सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक बळ मिळेल".[७]

सामाजिक न्याय देण्यासाठी केलेल्या आरक्षणाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

**अनुच्छेद - १५ (४) नुसार -** शासन सामाजिक, शैक्षणिक दृष्टीने मागास असलेल्या अनुसूचित जाती, जमाती, तसेच मागास प्रवर्गाच्या विकासासाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत.

**अनुच्छेद - १६ (४) नुसार -** शासनाला असे वाटले की, मागास प्रवर्गांना पुरेसे प्रतिनिधित्व नाही तर अशा गटांना राखीव जागांचे प्रावधान केलेले आहे.

**अनुच्छेद - ४६ नुसार -** दुर्बल घटकांना म्हणजे मागासलेल्या गटांना नौकऱ्या, प्रशासनात विशेष संधी, देण्यात याव्यात.

**अनुच्छेद - ३८ (२) नुसार -** शासन आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी मागासांना पक्षपाती सोयी सुविधा देवू शकते.

**अनुच्छेद - १६४ (१) नुसार -** राज्याच्या मंत्री परिषदेत अनु.जाती, जमाती, मागासांच्या विकासासाठी एक मंत्री असावा.

**अनुच्छेद - ३३८ नुसार -** राष्ट्रपती, अनु.जाती, जमाती, अन्य मागासांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी अनु.जाती, जमाती आयोग निर्माण करेल.

ISSN : 2348-7143
Jan-Feb-March 2017

**अनुच्छेद - ३३० नुसार** - लोकसभेत अनु.जाती, जमाती, आरक्षण तसेच **कलम ३३१ नुसार** लोकसभेत ॲग्लो इंडियन समुदायांना प्रतिनिधित्व असेल, **कलम ३३२ नुसार** राज्यांच्या विधानसभेत अनु.जाती, जमातींना आरक्षण असेल.

**अनुच्छेद - ३३३ नुसार** - राज्यांच्या विधानसभेत राज्यपाल दोन ॲग्लो इंडियन समुदायांना प्रतिनिधित्व देईल.

अनुच्छेद - २७५ (१) नुसार - राज्यातील अनु.जाती, जमातींच्या प्रदेशांना कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आर्थिक अनुदान देईल.

१९९३ मध्ये राष्ट्रीय मागासवर्ग अधिनियम संमत करण्यात आला. त्यानुसार कलम ३४० नुसार मागासवर्गांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करुन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग निर्माण करण्यात आला.

वरिल आरक्षणांच्या तरतुदीनुसार अंमलबजावणी झालेली आहे. त्यामुळे अनु.जाती, जमाती आणि इतर मागास प्रवर्गांना आरक्षणाच्या संधीमुळे शिक्षण, प्रशासनात सहभाग, नोकऱ्यांच्या संधी मिळाल्या आहेत. त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झालेली आहे. सामाजिक प्रतिष्ठा मिळत आहे. त्याशिवाय अनेक कल्याणकारी योजनांचीही अंमलबजावणी झालेली आहे. पण कल्याणकारी राज्याच्या परतीच्या प्रवासामुळे वंचितांच्या संधी कमी होण्याच्या मार्गावर आहेत. पण समाजातील जात वास्तवाची मानसिकता कमी झालेली नाही. बहुसंख्य गरीब लोक या आरक्षणाच्या संधीपासून दूर राहिलेले आहेत. काही कुटूंबातील लोकांना भान आलेले आहे. त्यांनीच दोन-तीन पिढ्या आरक्षणाचा फायदा घेतलेले आहे. त्यासाठी ज्यांनी दोन पिढ्या आरक्षणाचा फायदा घेतलेला आहे, त्यांच्यापेक्षा ज्यांनी घेतलेलाच नाही. त्यांना प्राधान्य क्रम ठरविण्याची व्यवस्था करावी लागेल. एकंदरीत या सामाजिक न्यायामुळे भारताची एकसंघ राष्ट्रबांधणी होण्यास सहकार्य झालेले आहे.

**विविध समित्यामधील कार्य :-**

डॉ.आंबेडकरांनी संविधान निर्मितीच्या विविध समित्यांवर जे कार्य केले ते अत्यंत उपयोगी व मोलाचे मानले गेले. काँग्रेसच्या नेत्यांना खात्री पटली की डॉ.आंबेडकरांच्या सल्याशिवाय विधिनियमीकरण सुलभ होणार नाही. त्यांनी मुलभूत अधिकार समिती, अल्पसंख्यांक उपसमिती आणि संघ संविधान समितीचे सदस्य म्हणून मोलाची भुमिका बजावली. बंगालच्या विभाजनामुळे डॉ.आंबेडकरांचे संविधान सभेचे सदस्यत्व रद्द झाले. तेव्हा त्यांच्याशिवाय राज्यघटना निर्माण करणे अयोग्य होईल म्हणून संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री बी.जी.खेर यांनी पाठविलेल्या ३० जून १९४७ च्या पत्रात डॉ.आंबेडकरांची त्वरित संविधान सभेवर निवड होणे आवश्यक आहे. असे सुचविले होते. त्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ ला परत त्यांची निवड झालेली होती.'

भारतास 'संघराज्य' म्हणावे की राज्यांचा संघ म्हणावा यावरुन घटना परिषदेत बराच वाद झाला. डॉ.आंबेडकरांनी 'संघराज्य' या शब्दाऐवजी युनियन हा शब्द वापरण्याचे प्रामुख्याने दोन कारणे सांगितली आहेत. पहिले कारण असे की, भारतीय संघराज्याची निर्मिती घटक राज्यात अमेरिके प्रमाणे करार करुन झालेली नाही. दुसरे कारण असे की, भारतात अनेक बाबतीत विविधता आहे, भविष्यकाळात कोणत्याही राज्यास सांस्कृतिक अस्मितेच्या आधाराव संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार प्राप्त होवू नये यासाठी युनियन या शब्दाचा वापर करण्यात आला आहे.

त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून संविधानाचा मसुदा निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या या कार्याबद्दल संविधान सभेत अनेकांनी खुल्या मनाने प्रशंसा आणि अभिनंदनाचा वर्षाव केलेला

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Vol. 4, Issue-1
ISSN : 2348-7143
Jan-Feb-March 2017

होता. त्यात फ्रँक अॅन्थोनी म्हणतात 'ते एक कायदेतज्ञ असून त्यांनी संविधानाचा मसुदा मुद्देसूद आणि सुस्पष्ट विश्लेषणावद्दल त्यांचे अभिनंदन करतो.'

टी. टी. कृष्णम्माचारी म्हणतात "मसुदा समितीतील अनेक सदस्य कमी झालेले असतांना त्यांनी संविधानाचा मसुदा तयार करण्याचे कार्य निसंशय अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तिळमात्र शंका नाही. या करिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत." एवढेच नव्हे तर संविधान सभेतील अनेक मान्यवरांनी डॉ.आंवेडकरांचे खुल्या कंठाने कौतुक आणि अभिनंदन केलेले होते.[९]

घटनेच्या विविध कलमांवर संविधान सभेत तपशिलवार चर्चेच्या वेळी संपादकाकडून विचारल्या जाणाऱ्या शंकांना उत्तरे देणे, त्यांनी मांडलेल्या दुरुस्त्या नाकारताना त्यासाठी स्पष्टीकरण देणे आणि मसुद्यातील मजकूराची सुक्ष्म तपासणी करुन तो विनचुक करण्याचे अवघड कार्य बाबासाहेबांनी पार पाडले म्हणून भारतीय घटनेचे शिल्पकार ही उपाधी सार्थ ठरते.

**संदर्भ सूची :-**

१. सुहास पळशीकर, १५ ऑगस्ट २०१३, राजकारणाचा ताळेवंद, साधना प्रकाशन पुणे. पृष्ठ ३३.
२. पुर्वोक्त.
३. न्या.पी.वी.सावंत, ऑक्टोबर २००६, राज्य घटनेचा सरनामा व डॉ.आंवेडकर, लोकराज्य मुंबई.
४. पुर्वोक्त.
५. डॉ.यशवंत मनोहर, ऑक्टोबर २००६, धम्म म्हणजे भारतीय संविधानाचे प्राणतत्व, लोकराज्य, मुंबई, पृष्ठ १२२,१२३.
६. कृष्णा इंगळे, ऑक्टोबर २००६, सामाजिक न्याय आणि आरक्षण, लोकराज्य, मुंबई, पृ.१२८,१२९.
७. डॉ.मुंशीलाल गौतम, ऑक्टोबर २००६, कायदा आणि सामाजिक न्याय, लोकराज्य, मुंबई,पृ.९७.
८. संविधान सभेतील भाषणे आणि चर्चा, २०१२, प्रवुध्द प्रकाशन, नागपूर. पृ. १४.
९. The Gazetee of India, 26 February 1948.